# अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर
## नगरसचिव विभाग

**मा.प्रशासक यांजकडील मा.महासभा क्रमांक - ०५ विषयाबाबतचे निर्णय.**

**मा.प्रशासक ठराव क्रं.२०** **विषय क्रमांक - २०**

दिनांक : २०/०२/२०२४ विभाग : आस्थापना विभाग

| | |
|---|---|
| विषय क्रमांक - २०<br>दिनांक<br>२०/०२/२०२४ | अहमदनगर महानगरपालिका सेवाप्रवेश नियम व आकृतीबंध २०१६ मध्ये सुधारणा, दुरुस्ती व नविन पदे निर्माण करणे बाबत व नविन पदे निर्माण करणे बाबत<br>(वैद्यकीय अधिकारी बाबत) |
| ठराव क्रमांक - २०<br>दिनांक<br>२०/०२/२०२४ | अहमदनगर महानगरपालिकेच्या आस्थापना विभागाने प्रस्तावित केल्यानुसार अहमदनगर महानगरपालिका सेवाप्रवेश नियम दिनांक ०६ फेब्रुवारी, २०१६ अन्वये अहमदनगर महानगरपालिकेचा ३१ विभागाअंतर्गत एकुण २८७० पदांचा सुधारीत आकृतीबंध मंजूर केलेला असुन दिनांक १६ डिसेंबर, २०२१ रोजी व २८ मार्च, २०२२ अन्वये सदर सेवाप्रवेश नियमामध्ये सुधारणा करण्यांत आलेली आहे. अहमदनगर महानगरपालिका सेवाप्रवेश नियम व आकृतीबंध मध्ये वेळोवेळी प्राप्त होणा-या सूचनांच्या अनुषंगाने आस्थापना जा.क्रं.१४५१ दिनांक ०१/०८/२०२३ अन्वये कार्यालयीन परिपत्रक निर्गमित करण्यांत येवून सूचना मागविण्यांत आलेल्या आहेत.<br>तरी प्राप्त सूचनां बाबतचा गोषवारा व त्यावर कार्यालयीन अभिप्राय याबाबतचा कार्यालयाने तक्त्यात नमुद केलेला असुन अहमदनगर महानगरपालिका सेवाप्रवेश नियम व आकृतिबंध मध्ये कार्यातयाने विवरण पत्रामध्ये नमुद केल्याप्रमाणे सुधारणा, दुरुस्ती, नविन व जादा/ वाढीव पदे निर्माण करणे बाबतचा प्रस्ताव मान्यतेसाठी मा.शासनाकडे सादर करणेस मा. प्रशासक स्थायी समिती यांनी केलेल्या शिफारशीस मा.प्रशासक सर्व साधारण सभा मान्यता देत आहे. |
| निर्णय | महाराष्ट्र शासन, नगरविकास विभाग, शासन आदेश क्रमांक एमसीओ-२०२३/प्र.क्रं.४३१/ नवि-१४ मंत्रालय (मुख्य इमारत) मुंबई -३२ दिनांक २८/१२/२०२३ आदेश अन्वये प्राप्त अधिकारानुसार मा.महासभेच्या अधिकाराचा वापर करुन उपरोक्त ठरावास मा.प्रशासक यांनी मंजुरी दिली. |

**(मेहेर लहारे)**
नगरसचिव
अहमदनगर महानगरपालिका.
अहमदनगर ४१४००१.

**(डॉ.पंकज जावळे)**
प्रशासक
अहमदनगर महानगरपालिका.
अहमदनगर ४१४००१.